**CNR NO- MHSO060007602020**

**नियमित दिवाणी दावा क्र. ८५/२०२०**

**अंबादास भुसनर व इतर.**
वि.
महाराष्ट्र सरकार व इतर

## नि. क्र. १०३ वरील आदेश
## (घोषित दि. ०९/०१/२०२५)

०१] प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे दाखल करण्यात आलेला असून मयत वादी क्र.३ व ४ च्या वारसांना अभिलेखावर घेण्यास झालेल्या विलंबामुळे अबेटमेंटचा झालेला आदेश रद्द करण्याची विनंती करण्यात आलेली आहे.

०२] प्रतिवादीतर्फे प्रस्तुत अर्जास प्रखर विरोध करण्यात आलेला आहे.

०३] प्रस्तुतचा दावा हा जाहीर ठराव होवून मिळणेकरीता, निरंतर ताकीद मनाई हुकूम मिळण्याकरीता तथा इतर अनुषांगिक मागण्या मिळण्याकरीता दाखल करण्यात आलेला असून वादीच्या कथनानुसार वादी क्र.४ यांचा दि.११/०३/२०२३ रोजी व वादी क्र.३ यांचा दि.२२/०४/२०२४ रोजी मृत्यु झालेला असून मयताचे वारस पटलावर घेण्याकरीता झालेल्या विलंबामुळे अबेटमेंटचा आदेश रद्द करण्याबाबत विनंती करण्यात आलेली आहे. मयत वादी क्र. ३ व ४ हे वादी क्र. १ यांचे भाऊ व आई असून त्यांना प्रस्तुतचा दावा दाखल झाल्यानंतर दुरुस्तीव्दारे दाव्यामध्ये वादी म्हणून समाविष्ट करण्यात आले. प्रस्तुतचा अर्ज दि.३०/१२/२०२४ रोजी दाखल करण्यात आलेला आहे निश्चितपणे जो मयताचे वारस पटलावर घेण्याकरीता ९० दिवसांचा कालावधी संपल्यानंतर दाखल करण्यात आलेला आहे. असे जरी असले तरीही वादीने मयत वादी क्र. ३ व ४ यांचे वारसांना पटलावर घेण्याकरीता जाणिवपुर्वक विलंब केला असे दर्शविणारे कोणतीही परिस्थीती पटलावर उपलब्ध नाही. न्यायदानाच्या दृष्टीने वादी क्र. ३ व ४ च्या वारसांना पटलावर घेण्याकरीता झालेल्या विलंबामुळे त्याबाबत झालेली अबेटमेंट रद्द करणे न्यायोचित असल्याचे माझे मत झाले आहे, सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१]    अर्ज मंजूर करण्यात येतो.

२]    मयत वादी क्र. ३ व ४ बाबतचा अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येतो.

३]    खर्च मुळ दाव्यात.

AMIT ASHOKRAO KHANDALE
Digitally signed by AMIT ASHOKRAO KHANDALE
Date: 2025.01.09 17:49:13 +0530

**दि.०९/०१/२०२५.**

**(अमित अ.खंडाळे)**
**सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,**
**पंढरपूर.**

**CERTIFICATE**

I, affirm that the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per the original order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Employee | : | Shirsikar V. G., Stenographer |
| Court | : | Jt. C.J.S.D. Pandharpur |
| Date | : | 09.01.2025 |
| Judgment/order signed by | : | |
| the Presiding Officer on | : | 09.01.2025 |
| Judgment/Order uploaded on | : | 09.01.2025 |